मार्गदर्शक पुस्तिका क्र. 17

(मॅन्युअल – 17)

इतर उपयोगी माहिती.

**प्रशिक्षण कार्यक्रम**

पोहण्यास न येणाऱ्या नविन सभासदांना पोहण्याचे प्रशिक्षण देण्यात येते.

महिला सभासदांसाठी विशेष बॅचेस आहेत.

पोहता येणाऱ्यास निर्देशन शुल्कामध्ये सूट देण्यात येते. मात्र, त्यांनी पोहण्याची चाचणी उत्तीर्ण केली पाहिजे.

तरण तलावाचे सदस्य होण्यासाठी तीन पासपोर्ट आकाराचे फोटो, मान्यताप्राप्त डॉक्टरकडून त्वचा विकार नसल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र, 16(सोळा) वर्षाच्यापर्यंतच्या मुलांसाठी शाळेतून बोनाफाईड प्रमाणपत्र, वरिष्ठ नागरिकांसाठी वयाचा दाखला, महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी सेवेचा दाखला आणणे आवश्यक आहे.

वय वर्षे 2 ते 6 पर्यंतच्या मुलांना त्यांच्या पालकासोबत तरण तलावात प्रवेश घेण्यास परवानगी देण्यात येते.

सभासदाबरोबर दोन पाहुणे व्यक्तीना विहीत शुल्क भरल्यावर पोहण्यास परवानगी देण्यात येते. मात्र, पाहुण्यांना पोहता येणे आवश्यक आहे.

जे सभासद जिल्हा व राज्य स्थरावर स्पर्धेकरिता जाणार असतील त्यांचेवर विशेष लक्ष देऊन पूर्व तयारीसाठी जास्त वेळ दिला जातो.

इच्छुक सभासदानी मागणी केल्यास पोहण्याची चाचणी घेण्यासापेक्ष प्रमाणपत्र देण्यात येते.

**कर गोळा करणे**

शासनाकडून नेमून दिल्याप्रमाणे कर वसूल केला जातो.